पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.महिला व बालकल्याण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - **११**

**सभावृत्तांत**

दिनांक - **१४/०५/२०२१** वेळ - दुपारी **२.३०** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची **पाक्षिक** सभा **शुक्रवार** दिनांक **१४/०५/२०२१** रोजी दुपारी **२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि. ३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालीलप्रमाणे काही सन्मा.सदस्य सभागृहात तर काही सन्मा.सदस्य ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) उपस्थित होते.

१. **मा.लोखंडे चंदा राजू - सभापती**
२. मा.योगिता ज्ञानेश्वर नागरगोजे
३. मा.सविता बाळकृष्ण खुळे
४. मा.राजापुरे माधवी राजेंद्र
५. मा.गायकवाड निर्मला मनोज
६. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

या शिवाय मा.चारठाणकर - उप आयुक्त, मा.अरुण जागडे – प्र.कार्यालय अधिक्षक, मा.डॉ.डांगे – महिला वैद्यकीय अधिकारी, मा.पाटील- प्राचार्य, आयटीआय मा.ऐवले- समाज विकास अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.२) पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंतर्गत येणा-या सार्वजनिक शौचालये, संपुर्ण मनपा कार्यालये व दवाखाने येथे सॅनिटरी नॅपकीन व्हेडींग मशीन व डिस्पोजेबल मशीन बसविणेबाबत – मा.योगिता नागरगोजे, मा.निर्मला गायकवाड यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत महापालिकेच्या शिक्षण विभागाकडील सर्व बालवाडया, सर्व प्राथमिक शाळा व सर्व माध्यमिक शाळांमध्ये वॉटर फिल्टर व वॉटर कुलर (एकत्रित युनिट) बसविणेबाबत – मा.निर्मला गायकवाड, मा.योगिता नागरगोजे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) बचत गटांचे अनुदान कालावधीत सुधारणा करणेबाबत - मा.योगिता नागरगोजे, मा.निर्मला गायकवाड यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) मुकबधीर, मतिमंद, अंध व अपंगत्व असणारे गरजूंकरिता सामुदायिक विवाह सोहळयाचे आयोजन करणेबाबत - मा.निर्मला गायकवाड, मा.योगिता नागरगोजे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) पिंपरी चिंचवड महानगरपालिका शाळेमध्ये स्वच्छता किट पुरविणेबाबत - मा.निर्मला गायकवाड, मा.योगिता नागरगोजे यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक २२/०४/२०२१ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १०) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – ३४ विषय क्रमांक - ०१

दिनांक – १४/०५/२०२१ विभाग – नागरवस्ती विकास योजना

सुचक :- मा.योगिता नागरगोजे अनुमोदक : मा.सविता खुळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नावियो/२/कावि/३४/२०२१, दि.०५/०५/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत राबविण्यात येणा-या महिला बालकल्याण योजने अंतर्गत शहरातील महिलांच्या विकासासाठी, सक्षमीकरणासाठी विविध प्रकारच्या कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. महिलांना स्वयंरोजगार करता यावा, त्यादृष्टीने त्या सक्षम व्हाव्यात यासाठी महिलांना विविध प्रकारचे कौशल्य प्रशिक्षण देण्यात येते. कोविड १९ च्या कलावधीत लॉकडाऊनची परिस्थिती निर्माण झाली आणि या काळात मोलमजुरी करणारे, घरगुती काम करणारे या घटकाची आर्थिक स्थिती खालावली. तसेच लॉकडाऊन नंतर सुध्दा या घरगुती कामगारांना अनेक सोसायट्यांमध्ये कामासाठी येऊ देत नव्हते अशा परिस्थितीत महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत कोविड १९ प्रशिक्षित मोलकरीन या प्रशिक्षणाच्या माध्यमातून एकुण २६१६ घरगुती काम करणा-या मोलकरींना दहा दिवसांचे मोफत प्रशिक्षण देणेत आले. त्यामुळे लॉकडाऊन कालावधी संपलेनंरच्या काळात या प्रशिक्षित महिलांना पुन्हा कामावर घेतले गेले तसेच कोविड १९ संवेदनशिलता आणि जागरुकता हे प्रशिक्षण एकुण ५८५३९ महिलांना देण्यात आले. तसेच वृध्दांसाठी स्थानिक कोविड १९ स्वयंसेवक हे प्रशिक्षण एकुण १४७१४ महिलांना देणेत आले. या सर्व प्रशिक्षणाचा लाभ पुर्ण वेळ, अर्धवेळ घरगुती काम करणा-या महिला, लहान मुलांची, वृध्दांची शुश्रृषा करणाऱ्या महिला, सवयंपाक करणा-या महिला, साफसफाई करणा-या महिला या घटकांना लाभ मिळाला आहे. या सर्व कामाची दखल घेऊन पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील घरगुती काम करणा-या महिला कामगारांना सक्षम बनविण्याच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्रयत्नांना बळकटी देणेसाठी UN WOMEN ही संस्था पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि DWSSC या दोन संस्था समवेत एकत्र काम करणाच्या उद्देशाने सामंजस्य करार करु इच्छित आहे. UN WOMEN ही संस्था लैंगिक समानता आणि स्त्रीयांच्या सक्षमीकरणासाठी संयुक्त राष्ट्र

संघाची एक सहाय्यक संस्था म्हणुन कार्यरत आहे. ही संस्था महिला लैंगिक समानता आणि स्त्रीयांच्या सक्षमीकरणासाठी संयुक्त राष्ट्र संघाच्या वतीने काम करीत आहे. DWSSC ही संस्था NSDC ने स्थापन केलेली घरगुती कामगार क्षेत्र कौशल्य परिषद या नावाने ओळखली जाते. या संस्थेचे उद्दिष्ट भारतातील घरगुती कामगारांच्या कौशल्याच्या विकासासाठी राष्ट्रीय संस्थात्मक नेटवर्क प्रस्तापित करणे, घरगुती कामगारांसाठी व्यवसायासाठी मापदंड निश्चित करणे, घरगुती कामगारांचे प्रमाणीकरण, मुल्यांकन करुन प्रमाणपत्र देऊन त्यांना प्रमाणित दर्जा प्राप्त करुन देणे हे उद्दिष्ट आहे. UN WOMEN या संस्थेने सामंजस्य कराराचा (MOU) मसुदा पाठविला असून त्याचे अवलोकन होणेस विनंती.

**या करारनाम्यात खालील मुद्यांचा समावेश आहे.**

१) कौशल्य प्रशिक्षण व कौशल्य वाढ कार्यक्रमासाठी पिंपरी चिंचवड शहरातील व सध्या काम करीत असलेल्या महिला घरेलू कामगारांचे एकत्रीकरण करणे.

२) घरेलु कामगारांसाठी प्रशिक्षण कार्यक्रमांची तयारी करणे यामध्ये कोविड नंतरच्या परिस्थितीमध्ये काम कसे करावे, आर्थिक साक्षरता कार्यक्रम, स्पोकन इंग्लिश / संभाषण कौशल्ये, लैगिक आरोग्य (Reproductive and sexual health) कामाच्या ठिकाणी लैगिक छळ प्रतिबंध (Posh – Prevention of sexual harassment at workplace) आणि महिलांवरील हिंसाचार निर्मुलन (EVAM – Elimination of violence against women) इत्यादी.

३) लिंग समानता प्रशिक्षण कार्यक्रम अभ्यासक्रम तयार करणे आणि घरगुती महिला कामगारांना कौशल्य प्रशिक्षण देणे.

४) DWSSCही संस्था आणि NSDCयांचे संयुक्त विद्यमाने पिंपरी चिंचवड शहरातील घरगुती कामगारांना प्रमाणपत्र देण्यात येईल.

५) घरगुती कामगारांच्या सुरक्षा आणि सबलीकरणावर जागरुकता आणि सल्ला देणे.

६) घरेलु महिला कामगारांसाठी कौशल्य आणि रोजगार या संकल्पनेला बळकटी देऊन DWSSCआणि UN WOMENयांना हा संकल्प देशभर राबविता येईल.

**या करारनाम्याचे सामान्य उद्दिष्ट खालीलप्रमाणे असेल : -**

पिंपरी चिंचवड शहरातील घरेलु महिला कामगारांना कौशल्य आणि रोजगाराच्या प्रवेशास मदत करणे हे आहे आणि त्याद्वारे घरेलु कामगारांना गरिबीतुन मुक्त करणे, कामाच्या ठिकाणी होणारा छळ व शोषण दूर करणे आणि घरकामगारांना प्रमाणित कुशल कामगार दर्जा प्रदान करणे हे आहे.

**करारनाम्यातील पक्षकारांची भुमिका –**

पिंपरी चिंचवड मनपा – या कामाचा वस्तीपातळीवरील प्रसार, प्रचार आणि प्रशिक्षण यासाठी आवश्यक सर्व मदत प्रदान करेल.

डी.डब्ल्यु एस.एस.सी. – मान्यता, मुल्यांकन आणि प्रमाणपत्र यासाठी आवश्यक सर्व मदत प्रदान करेल.

यु.एन. वुमन – ज्ञान भागीदाराची भुमिका निभावतील.

हे तीन पक्ष एकत्रीतपणे काम करुन कामगार दलातील सर्वात दुर्लक्षीत गटांपैकी एक असणा-या घरेलु महिला कामगारांच्या सशक्तीकरण आणि लिंग समानता, सबलीकृत, शोषणमुक्त आणि आत्मनिर्भर राहणाच्या दृष्टीने एक नाविन्यपुर्ण मॉडेलची रचना करुन त्याची अंमलबजावणी करतील. या उपक्रमासाठी आवश्यक असणा-या खर्चाची तरतुद नागरवस्ती विकास योजना विभागाकडील पंडित दिनदयाल उपाध्याय – महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम या लेखाशिर्षातून करता येईल. तरी या उपक्रमाची अंमलबजावणी करणे त्यासाठी करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ३५ विषय क्रमांक - ०२

दिनांक – १४/०५/२०२१

सुचक :- मा.योगिता नागरगोजे अनुमोदक : मा.निर्मला गायकवाड

संदर्भ – मा.योगिता नागरगोजे, मा.निर्मला गायकवाड यांचा प्रस्ताव -

महिलांच्या आरोग्याच्या दृष्टीने मासिक पाळी दरम्यान वापरल्या जाणा-या सॅनिटरी पॅड वापराचे प्रमाण अत्यल्प आहे, त्यामुळे हे प्रमाण वाढविण्यासाठी तसेच वापरल्या जाणा-या सॅनिटरी पॅडचे विघटन होण्यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंतर्गत येणा-या सार्वजनिक शौचालये, संपुर्ण म.न.पा. कार्यालये व दवाखाने येथे सॅनिटरी नॅपकिन व्हेंडिंग मशीन व डिस्पोजेबल मशीन बसविणे करिता सर्व म.न.पा.कार्यालये व दवाखान्यांची अद्ययावत आकेडीवारीनुसार सदरचे प्रक्रियेमध्ये संपूर्ण प्रशासकिय कार्यवाही नागरवस्ती विभागामार्फत करणेत येऊन त्यानुषंगाने तातडीने कार्यवाही करणेस मान्यता देण्यात येत आहे. याकामीची तरतूद नागरवस्ती विकास योजना विभागाकडील महिला व बालकल्याण योजने अंतर्गत सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षातील अंदाजपत्रकातील पान क्र.३१२ वरिल अ.क्र.४६ या सार्वजनिक ठिकाणी/महाविद्यालयांमध्ये नाममात्र दराने सॅनेटरी नॅपकीन पुरविणेकामी वेंडींग आणि डिस्पोजिंग यंत्र पुरविणे या उपलेखाशिर्षावरिल उपलब्ध तरतूदीमधून करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सॅनिटरी नॅपकिन व्हेंडिंगच्या वापरातून अल्प दरात उत्तम दर्जाचे नॅपकिन उपलब्ध करून देता येईल. पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंतर्गत येणा-या महिला सार्वजनिक शौचालये, संपुर्ण म.न.पा. कार्यालये येथे २२३ व दवाखाने या ठिकाणी ३४ ब्लॉक आहेत. तरी सदर ठिकाणी सॅनिटरी पॅड वापराचे प्रमाण वाढविण्यासाठी मदत होईल व नॅपकिन विघटनाचे नियोजन सॅनिटरी नॅपकिन डिस्पोजल मशीन मार्फत केले जाईल. या उपक्रमाचा सकारात्मक विचार करून हा उपक्रम राबविणेस व त्याकामी येणा-या

खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३६ विषय क्रमांक - ०३

दिनांक – १४/०५/२०२१

सुचक :- मा.निर्मला गायकवाड अनुमोदक : मा.योगिता नागरगोजे

संदर्भ – मा.निर्मला गायकवाड, मा.योगिता नागरगोजे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत महापालिकेच्या शिक्षण विभागाकडील सर्व बालवाड्या, सर्व प्राथमिक शाळा व सर्व माध्यमिक शाळांमध्ये वॉटर फिल्टर व वॉटर कुलर (एकत्रित युनिट) बसविणेबाबत योजना राबविणेकरिता सर्व शाळांची अद्ययावत आकेडीवारीनुसार सदरचे प्रक्रियेमध्ये संपूर्ण प्रशासकिय कार्यवाही नागरवस्ती विभागामार्फत करणेत येऊन त्यानुषंगाने तातडीने कार्यवाही करणेस मान्यता देण्यात येत आहे. याकामीची तरतूद नागरवस्ती विकास योजना विभागाकडील महिला व बालकल्याण योजने अंतर्गत सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षातील अंदाजपत्रकातील पान क्र.३११ वरिल अ.क्र. २८ या मदर तेरेसा-शिक्षण मंडळाकडील बालवाडीतील/प्राथमिक शाळेतील मुलांच्या सर्वांगिण विकासात्मक योजना या उपलेखाशिर्षावरिल उपलब्ध तरतूदीमधून करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळेत ११० व माध्यमिक शाळांमध्ये १८ इतके वॉटर फिल्टर व वॉटर कूलर (एकत्रित युनिट) बसविणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३७ विषय क्रमांक - ०४

दिनांक – १४/०५/२०२१

सुचक :- मा.योगिता नागरगोजे अनुमोदक : मा.निर्मला गायकवाड

संदर्भ – मा.योगिता नागरगोजे, मा.निर्मला गायकवाड यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड शहरातील बचत गटांना महापालिकेमार्फत अनुदान दिले जाते. बचत गट अनुदान हे १ वर्षाने दिले जाते व त्यानंतर १० वर्षाने दिले जाते आहे. तर अनुदान देयचा कालावधी जास्तीचा न ठेवता बचत गटांना अनुदान हे १.५ वर्षाने, ३.५ वर्षाने, ७.५ वर्षाने व १० वर्षाने देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३८ विषय क्रमांक - ०५

दिनांक – १४/०५/२०२१

सुचक :- मा.निर्मला गायकवाड अनुमोदक : मा.योगिता नागरगोजे

संदर्भ – मा.निर्मला गायकवाड, मा.योगिता नागरगोजे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड शहरात मुकबधीर, मतिमंद, अंध व अंपगत्व असणारे बरेच नागरिक दारिद्र्य रेषेखाली आहेत. त्यांची आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे वैयक्तिकरित्या त्यांचे विवाह सोहळा पार पाडणे त्यांच्याकडून शक्य होत नसल्याचे वारंवार दिसून येत आहे. अशा मुकबधीर, मतिमंद, अंध व अंपगत्व असणा-या गरजू नागरिकांकरिता महानगरपालिकेमार्फत त्यांचे सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करत राहण्यास व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३९ विषय क्रमांक - ०६

दिनांक – १४/०५/२०२१

सुचक :- मा.निर्मला गायकवाड अनुमोदक : मा.योगिता नागरगोजे

संदर्भ – मा.निर्मला गायकवाड, मा.योगिता नागरगोजे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या बालवाडी वर्गांमधील बालकांना स्वच्छता किट पुरविले जाते. सदरचे प्रक्रियेमध्ये संपुर्ण प्रशासकिय कार्यवाही व साहित्य वाटप प्राथमिक शिक्षण विभागाकडून करणेत आली असून याबाबत वैद्यकिय विभागाकडून या स्वच्छता किट मधील साहित्य ठरविण्यात आले होते व सदर किटची खरेदी भांडार विभागाकडून करुन या कामी येणा-या खर्चाची तरतूद नागरवस्ती विकास योजना अंतर्गत सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षातील अंदाजपत्रकातील पान क्र.३११ वरिल अ.क्र. २८ या मदर तेरेसा-शिक्षण मंडळाकडील बालवाडीतील/प्राथमिक शाळेतील मुलांच्या सर्वांगिण विकासात्मक योजना या उपलेखाशिर्षावरिल उपलब्ध तरतूदीमधून करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तरी सदरची योजना सन २०२१-२२ या वर्षाकरिता महापालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागाकडील बालवाड्यांमधील शिशु व बालकांना स्वच्छता किट साहित्य वाटप प्राथमिक शिक्षण विभागाकडून करणेस तसेच याबाबत वैद्यकिय विभागाकडून या स्वच्छता किटमधील १.मास्क, २.साबण, ३.टुथ ब्रश, ४.कंगवा, ५.सॅनिटायझर, ६.हॅन्ड वॉश, ७.टुथ पेस्ट, ८.नॅपकीन, ९.अँन्टीसेप्टीक लिक्विड, १०.नेल कटर, ११.मेडीकेअर शाम्पू, १२.वाफेचे मशीन इ.साहित्य ठरवून सदरची खरेदी सन २०२१-२०२२ या वर्षाकरिता माहे जुन २०२१ ते एप्रिल २०२२ या कालावधी मध्ये दर तीन महिन्याने स्वच्छता कीट पुरविणेस मान्यता देणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.


सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( लोखंडे चंदा राजू )**
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/२४३/२०२१
दिनांक : १७/०५/२०२१



( **अरुण हरिभाऊ जागडे** )
**प्र.कार्यालय अधिक्षक**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.